जिल्हाधिकारी कार्यालय,अहमदनगर
क्र. सा.प्र./कार्या/सेतू कक्ष/251/2018
अहमदनगर दिनांक :-05/12/2018

प्रति,

विषय :- जिल्हा सेतु समितीसाठी वाहन भाडेतत्वावर घेणेबाबत...

संदर्भ ::- मा.जिल्हाधिकारी अहमदनगर यांचेकडील दिनांक 26/11/2018 रोजीची मंजुर टिपणी.

2/- उक्त संदर्भाकींत विषयाबाबत अहमदनगर जिल्हयात 'आपले सरकार सेवा केंद्रे' शासन निर्णय क्र .मातंसे 1716/प्र.क्र.517/39 दिनांक 19 जानेवारी 2018 अन्वये, महानगर पालिका, नगर परिषद, नगर पंचायत व ग्रामपंचायत स्तरावर लोकसंख्येच्या प्रमाणानुसार स्थापन करणेचे निर्देश आहेत. तसेच राष्ट्रीय भूमी अभिलेख आधुनिकीकरण कार्यक्रम अंतर्गत ई-स्कॅनिंग प्रकल्पाची अंमलबजावणी कामी जिल्हयामध्ये विविध दौरे, 7/12 संगणकीकरण, मा.मुंबई उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद येथील न्यायिक कामकाज, तसेच अन्य शासकीय कामासाठी उपजिल्हाधिकारी महसूल त्यांना वारंवार मुख्यालयाच्या बाहेर फिरती करावी लागते. स्वतंत्र शासकीय वाहन नसलेने फिरती करणेबाबत अडचणी येतात उक्त नमुद केलेल्या कामांकरीता मा.उपजिल्हाधिकारी महसुल तथा सदस्य सचिव, जिल्हा सेतु समिती, अहमदनगर यांचे करीता वाहन भाडेतत्वावर सुरुवातीस 6 महिन्यांकरीता घेणेस जिल्हा सेतु समितीच्या दिनांक 1/8/2018 रोजीच्या बैठकीस मंजुरी देणेत आलेली आहे. व यानंतर सदर वाहनाची आवश्यकता, निकड पाहून मुदतवाढ देणेत यावी असे मत आहे. खालील प्रमाणे अटी व शर्ती नमुद करुन दरपत्रके मागवीणेत येत आहे.

**जिल्हा सेतु समिती, जिल्हाधिकारी कार्यालय अहमदनगर जिल्हा- अहमदनगर (सन 2018-19) ई निविदा प्रक्रियेने मासिक भाडेतत्वावर जिल्हाधिकारी कार्यालय सेतु शाखेसाठी 1) टाटा सुमो गोल्ड BS - IV 2) महिंद्रा बोलेरो 7 Seater (BS IV )या प्रकाचे वाहन घेण्यासाठी प्रस्तावित अटी व शर्ती खालील प्रमाणे राहतील.**

## अटी व शर्ती

- निविदा दोन लिफाफा पध्दतीचा अवलंब करुन सादर करावयाची आहे. (लिफाफा 'अ' तात्रिक लिफाफा व लिफाफा 'ब' दराचा लिफाफा)
- लिफाफा अ मधील सर्व बाबींची पूर्तता केली असेल, तरच त्या निविदाधारकाचा लिफाफा 'ब' उघडण्यात येईल.
- निविदाधारकाच्या वतीने निविदेवर स्वाक्षरी करण्यास, निविदे संबधिच्या बैठकांना उपस्थित राहण्यास किंवा तांत्रिक किंवा इतर माहिती पुरविण्यास एखादया व्यक्तीची नियुक्ती केली असल्यास त्यासंबधीचे निविदाधारकाचे प्राधिकार पत्र (bidders power of attorney) देणे आवश्यक राहील.
- निविदाधारकाने निविदा सादर करताना निविदेमध्ये नमूद केलेल्या अटी व शर्ती, नियम या व्यतिरिक्त स्वतःची अट निविदेमध्ये समाविष्ट करु नये, अशा पध्दतीच्या सशर्त निविदा विचारात घेतल्या जाणार नाहीत.

- निविदा संदर्भात निविदा प्रक्रिये दरम्यान किंवा निविदा स्वीकृती नंतर कोणताही विवाद उत्पन्न झाल्यास जिल्हाधिकारी अहमदनगर यांचा निर्णय अंतिम राहील.
- निविदाधारकाने निविदा फॉर्म भरतांना अटी व शर्ती यांचे काळजीपूर्वक वाचन करुन तदनंतरच निविदा फॉर्म भरावा. अपूर्ण माहिती असलेला निविदा फॉर्म बाद करण्यात येईल.
- निविदा मंजूर करणे अथवा नाकारणे, आवश्यक वाटल्यास अटी व शर्ती मध्ये बदल करण्याचा किंवा दरासंदर्भात तडजोड (Negotiation) करणेबाबतचे सर्व हक्क जिल्हाधिकारी अहमदनगर यांचेकडेस राखून ठेवणेत आलेले आहेत.
- बयाणा रक्कम किंवा सुरक्षा अनामत रक्कम यावर कोणत्याही प्रकारचे व्याज देय असणार नाही.
- वाहन चालकासह व इंधनासह दर सादर करावेत.व्यापारी लिफाप्यात 2000 कि.मी.साठी चालक व इंधनासह मासिक भाडे व 2000 कि.मी.च्या पुढील अंतरासाठी चालकास व इंधनासह प्रति कि.मी.भाडे असे स्वतंत्र दर नमुद करावेत.
- सदर दर सर्व देय करांसह नमूद करावेत.
- इंधन / वंगण, वाहन दुरुस्तीचा खर्च पुरवठादारांस दयावा लागेल.
- वाहनाचा वापर जिल्हयातील ग्रामीण भागात, डोंगराळ भागात, शहरी भागात व बैठकीसाठी जिल्हयाबाहेर केला जाईल.
- वाहन जिल्हाधिकारी कार्यालयास दररोज 24 तास उपलब्ध करुन द्यावे लागेल (सार्वजनिक सुट्टयासहित)
- पुरविण्यात येणारे वाहन दिनांक 01 जानेवारी, 2016 नंतर खरेदी केलेले असावे.
- पुरवलेले वाहन नादुरुस्त झाल्यास/किंवा इतर कोणत्याही कारणास्तव उपलब्ध न झाल्यास त्याऐवजी तात्काळ बदली वाहन देण्याची सर्वस्वी जबाबदारी पुरवठादारांची राहील.
- पुरवठादारांस वाहन रदद् करावयाचे असेल तर, जिल्हाधिकारी अहमदनगर यांचे कार्यालयास एक महिन्याची आगाऊ नोटीस द्यावी लागेल, अन्यथा वाहन पुरवठादारा कडून एक महिन्याचा भाडेपट्टा दंड स्वरुपात वसूल केला जाईल.
- यशस्वी निविदा धारकांने पुरवठा केलेल्या वाहनावर कोणत्याही कारणास्तव दिवाणी अथवा फौजदारी दावा न्यायालयात दाखल नसावा.
- वाहन केवळ पुरवठादारांच्या अकार्यक्षमतेमुळे बंद राहिल्यास प्रतिदिनी पडणारे देय भाडे कपात करणेत येईल.
- करारनामा मुदतीच्या कालावधीत पुरविलेल्या वाहनाची विक्री किंवा हस्तांतरण करता येणार नाही.
- वाहन भाडे तत्वावर लावणेत आले नंतर वाहनास कोणताही अपघात झाल्यास होणारे सर्व प्रकारचे जीवीत व आर्थिक नुकसानीस वाहन मालक स्वतः जबाबदार राहील.
- वाहन मालकाने लॉगबुक अद्यावत करावे व ते प्रमाणित केल्यानंतर देयक सादर करावे त्याशिवाय मासिक भाडे अदा केले जाणार नाही.
- निविदा धारकास भाडेतत्वावर वाहनाचे अदा करण्यात येणा-या देयकातून नियमानुसार टीडीएस कपात करणेत येईल.
- कोणतीही निविदा स्वीकारण्याचा व नाकारण्याचा अधिकार जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा सेतु समिती अहमदनगर यांचेकडेस राखून ठेवण्यात येत आहे.
- यशस्वी अर्जधारकाने कामाचे आदेश प्राप्त होताच 7 दिवसाचे आत वाहन उपलब्ध करुन देणे बंधनकारक राहील वाहन उपलब्ध करुन न दिल्यास त्यांचे आदेश रद्द करणेत येईल.
- यशस्वी निविदाधारकांने पुरविलेल्या वाहनाबाबत कोणत्याही प्रकारची तक्रार प्राप्त झाल्यास तक्रारीबाबत अंतिम निर्णय घेण्याचा अधिकारी मा. जिल्हाधिकारी यांचे कडे राहील.
- करारनामा मुदतीदरम्यान वाहनांचे संपणारे टॅक्स व विमा अद्यावत करुन देण्याची जबाबदारी वाहन मालकाची राहील. सदर कागदपत्रे वेळोवेळी पूर्ण करण्यास वाहन मालकाने टाळाटाळ केल्यास होणा-या सर्व कायदेशीर नुकसानीस वाहन मालक सर्वस्वी जबाबदार राहील.

- यशस्वी पुरवठादाराने पुरवठा केलेल्या वाहनाची मूदत करारनामा करुन दिलेचे दिनांकापासून 11 महिन्याच्या कालावधीपर्यंत राहील.
- सदर बाबतचे कराराची मुदत कधीही व कोणतेही कारण न दाखविता संपुष्टात आणणेचे किंवा मुदत वाढ देणेचे अधिकार जिल्हाधिकारी यांचे कडे राखून ठेवणेत येत आहेत.
- निविदा उघडणेच्यावेळी मुळ कागदपत्रे व सदर कागदपत्राचा एक झेरॉक्स संच सोबत आणावा.
- निविदा मंजूरी नंतर अनामत रक्कम रु. 10,000/- मा. जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा सेतु समिती अहमदनगर यांचे नावे धनाकर्ष जमा करावा लागेल अनामत रक्कमेवर कोणत्याही प्रकारचे व्याज देय असणार नाही.
- वरील अटी पूर्ण करणा-या व कमी दरामध्ये वाहन उपलब्ध करुन देणा-या निविदाधारकास प्राधान्य देणेत येईल.

तरी आपण वरील सामुग्रीचा पुरवठा करणेस इच्छुक असल्यास आपण आपले सीलबंद दरपत्रक दि.15/12/2018 रोजी सकाळी 11.00 वाजेपर्यंत सेतू शाखेत सादर करावेत. प्राप्त दरपत्रके दि.15/12/2018 रोजी 5.00 वाजता माझे समक्ष उघडण्यात येतील.

उपजिल्हाधिकारी महसूल
तथा सदस्य सचिव,जिल्हा सेतू समिती
अहमदनगर

# जिल्हा सेतू समिती जिल्हाधिकारी कार्यालय अहमदनगर

## जिल्हा - अहमदनगर

## लिफाफा - अ (तांत्रिक लिफाफा)

जिल्हाधिकारी कार्यालय अहमदनगर (सेतु शाखा ) भाडेतत्वावर **टाटा सुमो गोल्ड BS - IV व महिन्द्रा बोलेरो 7** Seater (BS IV ) **वाहन** पुरविण्यासाठी अभिकर्त्याची नेमणूक करण्याकरिता सीलबंद निविदा मध्ये दिलेल्या सुचनांप्रमाणे खालील प्रमाणे बाबींची माहीती देत आहे.

| अ.नं. | तपशील | माहिती |
|---|---|---|
| 1 | निविदा धारक/फर्म/संस्था चे नाव, | |
| 2 | निविदा धारकांचे पुर्ण नांव | |
| 3 | पत्ता, | |
| 4 | दुरध्वनी क्रमांक | |
| 5 | ईमेल | |
| 6 | **वाहनाचा तपशील**<br>1) वाहनाचे आर.सी. बुक क्रमांक (छायांकीत प्रत सादर करावी)<br>2) खरेदी दिनांक | |
| 7 | वाहनाचा विमा/ टॅक्स अदयावत भरल्याचे कागदपत्रे (छायांकीत प्रत जोडावी) | |
| 8 | परिवहन संवर्गात नोंदणी प्रमाणपत्र क्रमांक (PERMIT) (छायांकीत प्रत सादर करावी) | |
| 9 | पीयुसी प्रमाणपत्र क्रमांक (छायांकीत प्रत जोडावी) | |
| 10 | पॅन/टॅन क्रमांक ( छायांकीत प्रत जोडावी) | |
| 11 | निविदाधारक आधारक्रमांक ( छायांकीत प्रत जोडावी) | |
| 12 | जी.एस.टी क्रमांक ( छायांकीत प्रत जोडावी) | |
| 13 | निविदेमधील अटी व शर्ती मान्य असलेबाबत रु.100 च्या स्टँपवर नोटरी/कार्यकारी दंडाधिकारी यांचे समोर केलेले प्रतिज्ञापत्र. | |

**दिनांक- / / 2018**

**ठिकाण-**

स्वाक्षरी

नांव( )

शिक्का

# जिल्हा सेतू समिती जिल्हाधिकारी कार्यालय अहमदनगर

## जिल्हा - अहमदनगर

## लिफाफा - ब (व्यापारी लिफाफा)

1) निविदा धारकांचे नाव ----------------------------------------------------

2) निविदा धारकांचा पत्ता ----------------------------------------------------

----------------------------------------------------

----------------------------------------------------

3) निविदा धारकांचा अनुभवाचा तपशील ----------------------------------------------------

----------------------------------------------------

4) निविदेतील वाहनाचा प्रकार व दरपत्रक (प्रतिमाह)

| वाहनाचा प्रकार | दरमहा वाहनभाडे | |
|---|---|---|
| | 2000 कि.मी. पर्यत चालकासह व इंधनासह (रुपये/पैसे) | 2000 कि.मी. चे पुढे चालकासह व इंधनासह प्रति कि.मी. (रुपये/पैसे) |
| 1 | | 2 |
| | | |

निविदाधारकांची स्वाक्षरी
(नाव )